**प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अभिसरणातील अकुशल कामाच्या नोंदी ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांचेव्दारे कार्यान्वित करण्याबाबत.....**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः प्रआयो-२०१७/प्र.क्र.२७७/योजना-१०**
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
तारीख: २० नोव्हेंबर, २०१७.

वाचा:-

१) **शासन निर्णय क्रमांकः क्र.मग्रारो-२०१४/प्र.क्र.६४-अ/रोहयो-१०-अ, दि.३० मे, २०१५.**

२) **शासन निर्णय क्रमांकः पीएमववाय-जी-२०१६/प्र.क्र.३९/योजना-१०, दि.२७ मे, २०१७.**

**प्रस्तावना:-**

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) व इतर राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनेची कामे कार्यान्वित करतांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत ९०-९५ दिवसाचा अकुशल रोजगार अभिसरण स्वरूपात अनिवार्य करण्यात आला आहे. सदरील अभिसरणाच्या अनुषंगाने सदरील रोजगार निर्मिती आणि त्या अनुषंगाने द्यावयाची मजूरी यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गतची हजेरीपत्रके वापरण्यात येतात. सदरील हजेरीपत्रके संबंधित ग्राम रोजगार सेवकांने उपलब्ध करून घ्यावयाची असून मजुराची उपस्थिती, देयक मंजूरी यासारख्या नोंदी मनरेगा अंतर्गतचे पालक तांत्रिक अधिकारी हे मनुष्यबळ M-Book मध्ये नोंदवितात. त्यामुळे एकाच कामासाठी दोन तांत्रिक मनुष्यबळ एकाच M-Book मध्ये नोंदी करत असल्याचे दिसून येते. त्यामुळे कामासाठी विलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे एकाच कामासाठी दोन तांत्रिक मनुष्यबळाच्या भेटीमुळे या मनुष्यबळाचा पूर्ण क्षमतेने वापर होत नाही. याबाबी विचारात घेता मनरेगा अंतर्गत कामासाठी वापरल्या जाणाऱ्या हजेरी पत्रकाच्या नोंदी, अनुषंगिक नोंदी ह्या पालक तांत्रिक अधिकाऱ्याऐवजी ग्रामीण गृहनिर्माण अभियंता/नियमित अभियंता (ज्यांच्याकडे सदरील क्षेत्र असेत तर) यांचेकडे सोपविण्याची बाब विचाराधीन आहे.

**शासन निर्णय:-**

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) व इतर राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनेची कामे कार्यान्वित करतांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत ९०-९५ दिवसाचा अकुशल रोजगार अभिसरण स्वरूपात अनिवार्य करण्यात आला आहे. सदरील अभिसरणाच्या अनुषंगाने सदरील रोजगार निर्मिती आणि त्या अनुषंगाने द्यावयाची मजूरी यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजन अंतर्गतची हजेरीपत्रके वापरण्यात येतात. सदरील हजेरीपत्रके संबंधित ग्राम रोजगार सेवकांने उपलब्ध करून घ्यावयाची असून मजुराची उपस्थिती, देयक मंजूरी यासारख्या नोंदी मनरेगा अंतर्गतचे पालक तांत्रिक अधिकारी हे मनुष्यबळ M-Book मध्ये नोंदवितात. त्यामुळे एकाच कामासाठी दोन तांत्रिक मनुष्यबळ एकाच M-Book मध्ये नोंदी करत असल्याचे दिसून येते. त्यामुळे कामासाठी विलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे एकाच कामासाठी दोन तांत्रिक मनुष्यबळाच्या भेटीमुळे या मनुष्यबळाचा पूर्ण क्षमतेने वापर होत नाही. याबाबी विचारात घेता मनरेगा अंतर्गत कामासाठी वापरल्या जाणाऱ्या हजेरी पत्रकाच्या नोंदी, अनुषंगिक नोंदी ह्या पालक तांत्रिक अधिकाऱ्याऐवजी आता ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांचेकडे सोपविण्यास मान्यता देण्यात येत आहे. अपवादात्मक परिस्थितीत ज्या ठिकाणचे क्षेत्र ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्याकडे नाही, अशा ठिकाणी सद्या प्रचलित पध्दतीप्रमाणे पालक तांत्रिक अधिकारी पार पाडतील.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत कामासाठी वापरल्या जाणाऱ्या हजेरी पत्रकाच्या नोंदी, अनुषंगिक नोंदी ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी घेण्यासाठी म्हणजेच पालक तांत्रिक अधिकारी यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांना खालीलप्रमाणे मानधन देण्यात येईल-

| अ.क्र. | कामाचा टप्पा | अनुज्ञेय मनुष्य दिवस | | अतिरिक्त मानधन (रूपये) | |
|---|---|---|---|---|---|
| | | साधारण क्षेत्र | दुर्गम/डोंगराळ/IAP | साधारण क्षेत्र | दुर्गम/डोंगराळ/IAP |
| १ | जोते पुर्ण | २८ | ३० | २८ | ३० |
| २ | लिंटल पूर्ण | २४ | २५ | २४ | २५ |
| ३ | छतासह पूर्ण | १० | १० | १० | १० |
| ४ | घरकुल शौचालयासह पूर्ण | २८ | ३० | २८ | ३० |
| | **एकूण** | **९०** | **९५** | **९०** | **९५** |

ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांना वरीलप्रमाणे अतिरिक्त मानधन हे प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) योजनेच्या प्रशासकीय खर्चासाठीच्या निधीमधून भागविण्यात येईल. हे अतिरिक्त मानधन ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यास जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून दरमहा देय होणाऱ्या मानधनासोबतच स्वत्रंतपणे थेट अदा करावे. या अतिरिक्त मानधन रक्कमेवर संस्थेस देय सेवा शुल्क अथवा इतर कोणतेही कर/शुल्क दिले जाणार नाही. मात्र या कामाच्या अनुषंगाने सर्वस्वी जबाबदार संबंधित ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांची राहील.

सदर आदेश दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ पासून दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत अंमलात राहतील. याबाबतचा आढावा घेऊन यास मुदतवाढ देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११२०१३३०५५६१२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Madhao Kale

Digitally signed by Anil Madhao Kale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e29bfbc8f31dc2b43b5ba876864f627ec1dc888a2c6faead66c26cb1a5c2f137, cn=Anil Madhao Kale
Date: 2017.11.20 16:59:03 +05'30'

**(अ.मा.काळे)**
अवर सचिव, ग्राम विकास विभाग

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.विरोधी पक्ष नेता, विधान सभा/ विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५) सर्व विधानसभा व विधान परिषद सदस्य
६) मा.मुख्य सचिव, यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई.

८) महालेखापाल (लेखापरीक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१.
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ज राज्य-२, नागपूर.
१०) महालेखापाल (लेखापरिक्षण), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर.
११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१३) अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (सर्व)
१४) सर्व विभागीय आयुक्त
१५) सर्व जिल्हाधिकारी
१६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१७) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य जीवनन्योती अभियान, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई
१८) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, सी.बी.डी.,बेलापूर, नवी मुंबई
१९) संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२०) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
२१) ग्राम विकास व जलसंधारण विभागातील सर्व सह/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२२) उप सचिव, सामाजिक न्याय, आदिवासी विकास, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२३) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व)
२४) गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
२५) अतिरिक्त संचालक, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम कक्ष, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.
२६) निवड नस्ती (कार्यासन योजना-१०)